विविधा

# कृषिविषयक माहितीसाठी उपयुक्त मोबाईल ॲप्स




**प्रा. संजय बडे**
(मो.नं. ७८८८२९७८५९)
दादासाहेब पाटील कृषी महाविद्यालय, दहेगाव,
ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर






कृषिविस्ताराच्या कार्यक्रमांमध्ये आजवर दूरदर्शन, रेडिओ, वर्तमानपत्रे, माहितीपत्रके, पुस्तके तसेच मासिके अशा विविध पर्यायांचा वापर केला गेला. मात्र शेतकऱ्यांच्या गरजेनुसार अगदी त्यांच्या हातामध्ये कृषिविषयक माहितीची उपलब्धता मोबाईल फोनच्या माध्यमातून करणे शक्य आहे. त्यासाठी विविध कृषिविषयक ॲप्सची माहिती या लेखातून घेऊ.

अलिकडे ग्रामीण भागामध्येही मोबाईल, विशेषत: स्मार्टफोनचा वापर वाढला आहे. सुरुवातीच्या तुलनेमध्ये स्वस्तात इंटरनेटही उपलब्ध होत आहे. त्यामुळे प्रत्येकाच्या हातामध्ये असलेल्या उपकरणांव्दारे कृषिविस्ताराचा वेग प्रचंड वाढू शकतो. कृषिविस्ताराच्या कार्यक्रमांमध्ये आजवर दूरदर्शन, रेडिओ, वर्तमानपत्रे, माहितीपत्रके, पुस्तके तसेच मासिके अशा विविध पर्यायांचा वापर केला गेला. मात्र शेतकऱ्यांच्या गरजेनुसार अगदी त्यांच्या हातामध्ये कृषिविषयक माहितीची उपलब्धता मोबाईल फोनच्या माध्यमातून करणे शक्य आहे. त्यासाठी विविध कृषिविषयक ॲप्सची माहिती या लेखातून घेऊ.

**१. कीड व्यवस्थापन ॲप :** विविध पिकांवर येणाऱ्या अनेक प्रकारच्या किर्डीमुळे मोठे नुकसान होते. त्यांच्या नियंत्रणासाठी केवळ रासायनिक कीटकनाशकांचा वापर करण्यापेक्षा एकात्मिक कीड व्यवस्थापन पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे असते. या ॲपमध्ये ज्वारी, कापूस, केळी, मका, बाजरी, गहू, तूर, मूग, उडीद, हरभरा, सोयाबीन, करडई, मोहरी, जवस इत्यादी पिकांवरील एकात्मिक कीड व्यवस्थापनाची माहिती दिली आहे. त्यात नमूद कीटकनाशके, त्यांच्या मात्रा यांची शिफारस कृषी विद्यापीठे, केंद्रीय कीटकनाशक मंडळ (फरिदाबाद) आणि प्रकाशित संशोधने यावर आधारलेली आहे.



**२. एकात्मिक तण व्यवस्थापन ॲप :** राष्ट्रीय कृषी विकास योजना तंत्रज्ञान प्रसार प्रकल्प, कृषी तंत्रज्ञान माहिती केंद्र, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ (परभणी) यांच्याव्दारे हे ॲप विकसित केले आहे. या ॲपमध्ये तणांमुळे होणारे नुकसान, तण नियंत्रणाचे उपाय, तणनाशके व त्यांचे प्रकार, तणनाशकांचा पीकनिहाय वापर, विविध पिकांतील तणनियंत्रण शिफारशी, सध्या बाजारात उपलब्ध व उपयोगातील तणनाशकांची यादी इत्यादी संदर्भात माहिती दिली आहे.

**३. पशुपोषण ॲप :** आणंद (गुजरात) येथील राष्ट्रीय दुग्ध विकास मंडळ यांनी विकसित केलेल्या या ॲपव्दारे जनावरांच्या संतुलित पोषणाबद्दल माहिती मिळते. त्यात गाय किंवा म्हैस यांचे वय, दुग्धोत्पादन, दुधातील फॅट आणि आहार व्यवस्थापन इत्यादी माहिती भरल्यास किमान खर्चामध्ये संतुलित खाद्य व्यवस्थापन करण्यासंदर्भात माहिती उपलब्ध होते.

**४. पीकपोषण ॲप :** या ॲपमध्ये विविध पिकांसाठी आवश्यक असणारी प्रमुख अन्नद्रव्ये आणि सूक्ष्म अन्नद्रव्ये तसेच त्यांचे कार्य, कमतरतेची लक्षणे आणि उपाय यांची माहिती पिकांच्या छायाचित्रांसह दिली आहे. विविध प्रकारच्या जमिनीत असणारी अन्नद्रव्यांची कमतरता, अन्नद्रव्यांच्या कमतरतेस कारणीभूत ठरणारे जमिनीचे गुणधर्म, कमतरतादर्शक लक्षणे यांची माहिती उपलब्ध आहे.

**५. पुसा कृषी ॲप :** भारतीय कृषी संशोधन संस्थेने विकसित केलेल्या तंत्रज्ञानाची माहिती देण्याच्या उद्देशाने केंद्रीय कृषिमंत्र्यांनी २०१६ मध्ये हे ॲप प्रक्षेपित केले. त्यात भारतीय कृषी संशोधन परिषदेने विकसित केलेल्या पिकांचे नवीन वाण, संबंधित पूरक माहिती, संसाधन- संवर्धन पद्धती आणि कृषी यंत्रे यांची माहिती उपलब्ध केली आहे.

**६. कापूस ॲप :** परभणी कृषी विद्यापिठातील कृषी कीटकशास्त्र विभाग आणि केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर यांच्या सहभागातून कापूस लागवड तंत्रज्ञानाची शास्त्रीय माहिती उपलब्ध करण्यासाठी हे कापूस ॲप विकसित केले आहे. त्यात कापूस लागवडीची पूर्वतयारी, वाणांची निवड, बीजप्रक्रिया, अन्नद्रव्यांचे व्यवस्थापन, तणनियंत्रण व आंतरमशागत, पाणी व्यवस्थापन, कापूस वेचणी व साठवणूक यांची माहिती दिली आहे.

**७. ॲग्री मार्केट ॲप :** मोबाईल वापरकर्त्यापासून ५० कि.मी. अंतरातील सर्व बाजारपेठांमधील शेतीमालाच्या किंमतींची माहिती शेतकऱ्यांपर्यंत पोहचवण्यासाठी केंद्र सरकारने हे ॲप विकसित केले आहे. यात जी.पी.एस. यंत्रणा वापरली जाते. हे ॲप हिंदी व इंग्रजी भाषेमध्ये उपलब्ध आहे.

**८. किसान सुविधा ॲप :** २०१६ मध्ये कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालय, भारत सरकारव्दारे शेतकऱ्यांचे सक्षमीकरण आणि गावांच्या विकासासाठी हे मोबाईल ॲप विकसित केले आहे.

**९. किसान सारथी पोर्टल ॲप :** भारत सरकारने शेतकऱ्यांना त्यांच्या स्थानिक भाषांमध्ये शेतीविषयक माहिती योग्य वेळी पोहोचविण्यासाठी किसान सारथी पोर्टल सुरु केले आहे. त्या- त्या जिल्ह्यातील कृषी विज्ञान केंद्र या पोर्टलव्दारे कृषीविषयक सल्ला देण्याचे काम करते. या पोर्टलच्या १८००१२३२१७५/ १४४२६ या टोल फ्री क्रमांकावर एकदा नोंदणी केल्यास कृषी तज्ज्ञांकडून सल्ला मिळतो.

**१०. दामिनी ॲप :** भारत सरकारच्या विज्ञान- तंत्रज्ञान मंत्रालयाने विकसित केलेले दामिनी हे मोबाईल ॲप पावसाळ्यात विजा कोसळून होणाऱ्या जीवितहानीच्या घटना टाळण्यासाठी उपयुक्त ठरते. यातून वादळी पाऊस, विजांचा कडकडाट आणि वीज कोसळण्याचा अंदाज व पूर्वसूचना मिळते. यातील बहुतांश ॲप्स शासनाने व विद्यापीठांनी विकसित केलेली असल्यामुळे मोफत आहेत. ■